दैनिक सेवाशक्ती टाईम्स

https://www.sewashaktitimes.com | मुख्य संपादक - अंकोश जानु राठोड - 9011509831 | कार्यकारी संपादक - गजानन सरकटे - 8605433822 | E-mail: ankoshrathod25@gmail.com

बुलडाणा ● वर्ष:- 3 रे ● अंक:- ९४ ● पाने:- ४ ● किंमत:- २ रुपये ● RNI:- MAHMAR/2022/87884 ● सोमवार २६ मार्च २०२५

# 'पूर्वी लोकांना मारायचं, शेंदूर घालायचे....'; ऑपरेशन सिंदूरवरून राऊतांचा मोदींना टोला

सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा



**मुंबई :** शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी पुन्हा एकदा ऑपरेशन सिंदूरवरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला आहे. 'माझ्या नसानसांत आता रक्ताऐवजी सिंदूर वाहत आहे,' असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं होतं. यावर प्रतिक्रिया देताना संजय राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्लाबोल केला. ते आंबेगाव मध्ये कार्यकर्ता मेळाव्यात बोलत होते.मोदींनी किती सिंदूर लावायचा तो लावावा, पूर्वी कोणाला मारायचे असेल तर त्याच्या जेवणात शेंदूर घातला जायचा, असं राऊत यांनी म्हटलं आहे. दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की, राज कारणात काय उलथापालथ होईल ते सांगता येत नाही, त्यामुळे स्वबळावर लढण्याची तयारी ठेवली पाहिजे. ज्यांना पक्षांनी सर्वाधिक दिले ते सोडून गेले, पण ज्यांना काहीच मिळाले नाही ते आज बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराने एकत्र आहेत. आता लढाई सुरू करा आम्ही तयार आहोत, असं म्हणणारे कार्यकर्ते हेच शिवसेनेचं बळ आहे, असं राऊत यांनी म्हटलं आहे.दरम्यान आंबेगावमध्ये शरद पवारांना सोडून गेलेले त्यांच्याच बाजुला बसतात मुके घेतात. बाजूला बसतात एकमेकांकडे बघत सुद्धा नाहीत. पण आम्हाला सोडून गेलेले समोर कोन येत नाही, बाजुने कोन जात नाही, ऐवढंच काय मोदीही माझ्या जवळ येत नाहीत, असंही यावेळी संजय राऊत यांनी म्हटलं आहे. मशाल चिन्ह आणि आपली शिवसेना हीच खरी शिवसेना आहे. मला तुरुंगात टाकले साडेतीन महिन्यांनी सुटलो, बाळासाहेब ठाकरेंची पुण्याई शिवसैनिकाला किती दिवस तुरुंगात ठेवायचे असं न्यायदेवतेला वाटलं असावं हीच ठाकरेंची पुण्याई आहे. तुम्ही विरोधात असाल तर सत्तेच्या विरोधात लढलं पाहिजे, सत्ताधाऱ्यांशी हातमिळवणी करायची नाही. शिवसेनेची ओळख ही आंदोलनामुळे आहे, अनेक प्रश्न हाती घेऊन त्यावर आंदोलन उभी करा लोक तुमच्यामागे येतील, संघटना नसती तर खेडमध्ये आमदार निवडून आला नसता, संघटनेत मोठी ताकद आहे. खेडनंतर आंबेगावमध्ये शिवसेनेचा आमदार करायचा आहे, फक्त तुम्ही ताकद द्या, असं आवाहन यावेळी राऊत यांनी आपल्या कार्यकर्त्यांना केलं.

## नेमकं काय म्हणाले संजय राऊत?

**मोदींनी किती सिंदूर लावायचा तो लावावा, पूर्वी कोणाला मारायचे असेल तर त्याच्या जेवणात शेंदूर घातला जायचा, असं राऊत यांनी म्हटलं आहे. दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की, राजकारणात काय उलथापालथ होईल ते सांगता येत नाही, त्यामुळे स्वबळावर लढण्याची तयारी ठेवली पाहिजे. ज्यांना पक्षांनी सर्वाधिक दिले ते सोडून गेले, पण ज्यांना काहीच मिळाले नाही ते आज बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराने एकत्र आहेत. आता लढाई सुरू करा आम्ही तयार आहोत, असं म्हणणारे कार्यकर्ते हेच शिवसेनेचं बळ आहे, असं राऊत यांनी म्हटलं आहे.**

# पुणे हादरलं! लग्नाच्या 5 महिन्यांतच पूजाची आत्महत्या, आत्महत्यचा कारण वाचून धक्काच बसेल!

सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा



**पुणे :** पुण्यातील वैष्णवी हगवणे या विवाहितेच्या आत्महत्येने संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे. 51 तोळे सोनं, फॉर्च्यूनर गाडी हुंडा म्हणून देऊनही सासरच्या मंडळींचा जाच चालूच असल्यामुळे वैष्णवीने स्वत:ला संपवलं आहे. दरम्यान, ही घटना ताजी असतानाच आता पुण्यातीलच पिंपरी चिंचवड येथील आणखी एक धक्का दायक घटना समोर आली आहे. येथे एक 22 वर्षीय विवाहिता हुंडाबळी ठरली आहे. माहेरच्या मंडळींनी दुचाकी घेण्यासाठी 50 हजार रुपये न दिल्याने तिचा जाच चालू होता.

### नेमकं प्रकरण काय?

मिळालेल्या माहिती नुसार पुण्याती पिंपरी चिंचवड येथे वैष्णवी हगवणे हिच्याप्रमाणेच आणखी एका विवाहितेने आत्महत्या केली आहे. विशेष म्हणजे ही विवाहिता अवघ्या 22 वर्षांची असून लग्नाच्या पाचव्या महिन्यातच तिने सासरच्या मंडळींच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केली होती. या घटनेला होऊन एक महिना उलटला असून या प्रकरणातील आरोपी अद्याप मोकाटच आहेत. पिंपरी चिंचवड पोलिसांच्या याच हलगर्जीपणामुळे संताप व्यक्त केला जात आहे.

### लग्नानंतर पाच महिन्यांतच आत्महत्या!

आत्महत्या केलेल्या 22 वर्षीय विवाहितेचे नाव पूजा निर्वळ असे आहे. पूजाच्या मृत्यूप्रकरणी पती गजानन निर्वळ आणि नणंद राधा यांच्याविरुद्ध छळ केल्या प्रकरणी हुंडाबळीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र फक्त गुन्हा दाखल करून पोलीस शांत बसले आहेत. या प्रकरणातील आरोपी अजूनही मोकाटच आहेत. लग्न झाल्यानंतर अवघ्या पाचव्या महिन्यातच पूजाने आत्महत्या केली होती. दुचाकी घेण्यासाठी पूजाच्या माहेरच्यांनी 50 हजार रुपये दिले नव्हते. याच कारणामुळे गेल्या अनेक दिवसांपासून तिचा छळ केला जात होता. परिणामी या जाचाला कंटाळून तिने आत्महत्येचं टोकाचं पाऊल उचललं होतं.

### पोलीस सहकार्य करत नसल्याचा आरोप!

दरम्यान, आमच्या मुलीची आत्महत्या नसून तिची हत्या करण्यात आली आहे. या प्रकरणात पोलीस आम्हाला सहकार्य करत नाहीयेत, असा आरोप पूजाच्या कुटुंबीयांनी केला आहे. तर पोलिसांना याबाबत विचारलं असता या प्रकरणी आम्ही गुन्हा दाखल केला असून तपास चालू असल्याचं पोलिसांनी सांगितलं आहे.

# तर भुजबळ तिसरे उपमुख्यमंत्री...गिरीश महाजनांचा जबरी टोला, आताच धुसफूस चव्हाट्यावर?

सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा




**मुंबई :** राज्य सरकार सत्तेत आल्यानंतर हेवीवेट नेते छगन भुजबळ यांना सहा महिन्यांनी मंत्री पद मिळाले. सत्तेत असूनही पद नसल्याने भुजबळ नाराज होते. त्यांनी शेरो शायरीतून ही नाराजी वारंवार व्यक्त केली होती. धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिल्यानंतर भुजबळ यांना मंत्रिमंडळात संधी देण्यात आली. त्यावर राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात तीव्र प्रतिक्रिया पण आल्या. महायुती तील घटक पक्ष भाजपाचे नेते आणि मंत्री गिरीश महाजन यांनी भविष्यातील धुसफुसीचे संकेत आताच दिले आहेत.

### तर ते तिसरे उपमुख्यमंत्री!

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे आपल्याला मंत्रिपद मिळाल्याचे भुजबळ म्हणाले होते. त्यावर गिरीश महाजन यांनी प्रतिक्रिया दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब आहेत त्यांचे शिवाय होणारच नाही. पालकमंत्री पदावर दावा करणं काय वाईट आहे, असे ते म्हणाले. मुख्यमंत्र्यांनी ठरवलं तर ते अजून काही होऊ शकतात... तिसरे उपमुख्यमंत्री सुद्धा होऊ शकतात, असा टोला मंत्री गिरीश महाजन यांनी छगन भुजबळ यांना लगावला आहे. नाशिकच्या पालक मंत्री पदावरून प्रश्न विचारल्यावर मंत्री गिरीश महाजन यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मुख्य मंत्र्यांच्या हातात आहे कुणाला पालकमंत्री करायचं कुणाला मंत्री करायचं. असं कोणी काही म्हटलेलं नाहीये, तुम्ही पत्रकार फक्त त्यामध्ये तेल टाकू नका. ते तर म्हणत असतील की मी होणार आहे तर ते दावा करू शकतात चांगले आहे स्वागत आहे. आणि मुख्यमंत्र्यांनी ठरवलं तेथे सुद्धा त्यांना करू शकतात, असे महाजन म्हणाले.

### लाडक्या बहिणीमुळे तिजोरीवर बोजा!

लाडक्या बहिणीमुळे सरकारच्या तिजोरीवर 40-50 हजार कोटींचा खर्च वाढला आहे, असे भुजबळ म्हणाले. त्यावर ही महाजन यांनी प्रतिक्रिया दिली. हे लिखितच आहे. यात त्यांनी काय नवीन सांगितलं. हा काही गौप्यस्फोट आहे का? असा टोला महाजनांनी हाणला. जवळपास 30 हजार कोटी खर्च हा त्यामुळे वाढलेला आहे. असे ते म्हणाले. लाडकी बहीण योजनेतही निधी वळवण्याबत त्यांनी मत व्यक्त केले. याबाबत यापूर्वी अर्थमंत्र्यांनी याबाबत खुलासा केलेला आहे. मुख्यमंत्र्यांनी खुलासा केला आहे. बंधित खात्याच्या मंत्र्यांनी देखील याबाबत खुलासा केला आहे. ला वाटतं लाडक्या बहिणीचे पैसे देणं क्रमप्राप्त आहे. त्र कुठलाही निधी नियमबाह्य वळणार नाही हे सुद्धा बघायचं आहे.मला वाटतं कोणत्याही खात्यावर अन्याय होणार नाही, असे महाजन यांनी स्पष्ट केले.

# ऑपरेशन सिंदूरबद्दल पंतप्रधान मोदींची 'मन की बात'या रेडिओ कार्यक्रमाद्वारे जनतेशी संवाद

सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा



**मुंबई :** "आज संपूर्ण देश दहशता वादाविरुद्ध एकवटलं आहे. प्रत्येकाच्या मनात दहशता वादाविरोधात संताप आहे. आपल्याला हा दहशतवाद संपवायचा आहे, हा आज प्रत्येक भारतीयाचा संकल्प आहे. ऑपरेशन सिंदूरदरम्यान आपल्या सैन्याने दाखवलेल्या शौर्याचा प्रत्येक भारतीयाचा अभिमान आहे", असं पंतप्रधान नरेंद्र मोदी 'मन की बात' या कार्यक्रमात म्हणाले. शनिवारी त्यांनी या कार्यक्रमाद्वारे जनतेशी संवाद साधला. यावेळी त्यांनी दहशतवाद आणि ऑपरेशन सिंदूर हे दोन मुद्दे अधोरेखित केले. "काही दिवसांपूर्वी मी रायझिंग नॉर्थ ईस्ट समिटला गेलो होतो. तिथे मला अष्टलक्ष्मी महोत्सवाची माहिती मिळाली. सिक्कीमचे डॉ. चेवांग नोरबू भुटिया यांनी क्राफ्टेड फायबर्सला ब्रँड बनवलं. त्यांनी सिक्कीमच्या विणकाम परंपरेला एक नवी दिशा दिली. पेशाने पशुवैद्य असलेल्या भुटिया यांनी अनेक ग्रामीण महिलांना या कामाशी जोडलं. याअंतर्गत हस्त कलेच्या माध्यमातून शाल, स्टोल, हातमोजे आणि मोजे बनवले जातात", असं ते म्हणाले.'मन की बात'मध्ये मोदींनी एका गावाचीही गोष्ट सांगितली. ते म्हणाले, "बसने प्रवास करणं ही सर्वसामान्य गोष्ट आहे. पण मी तुम्हाला अशा एका गावाबद्दल सांगू इच्छितो जिथे पहिल्यांदाच बस आली. तिथले लोक वर्षानुवर्षे या दिवसाची प्रतीक्षा करत होते. जेव्हा बस पहिल्यांदाच या गावात पोहोचली, तेव्हा तिथल्या लोकांनी ढोल वाजवून त्याचं स्वागत केलं. हे गाव महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यातील आहे. काटेझारी असं या गावाचं नाव आहे. हे गाव माओवाद्यांच्या हिंसाचाराने प्रभावित होतं. इथं पहिली बस धावल्याने संपूर्ण परिसरात बदल जाणवत आहे. इथली परिस्थिती झपाट्याने सर्वसामान्य होत आहे." यावेळी त्यांनी दंतेवाडा जिल्ह्याच्या दहावी आणि बारावीच्या उत्कृष्ट निकालाबद्दल आनंदही व्यक्त केला.'मन की बात'मध्ये त्यांनी गुजरातच्या गीरमध्ये वाढलेल्या सिंहांच्या संख्येचाही उल्लेख केला. "गेल्या पाच वर्षांत गुजरातमधील गीरमध्ये सिंहांची संख्या 674 वरून 891 पर्यंत वाढली आहे. गुजरात हे पहिलं राज्य बनलंय जिथे महिला या वन अधिकारी पदावर मोठ्या प्रमाणात तैनात आहेत. यात सर्वांच्या मेहनतीचा वाटा आहे. वन्यजीव संरक्षणासाठी आपण नेहमीच सतर्क राहिलं पाहिजे."

## काय म्हणाले पंतप्रधान नरेंद्र मोदी ?

**ऑपरेशन सिंदूरबद्दल बोलताना ते पुढे म्हणाले, "आपल्या सैन्याने दाखवलेल्या शौर्याचा प्रत्येक भारतीयाला अभिमान आहे. त्यांनी सीमेपलीकडील दहशतवाद्यांचे अड्डे ज्या अचूकतेने उद्ध्वस्त केले ते थक्क करणारं आहे. ऑपरेशन सिंदूरने जगभरातील दहशतवादाविरुद्धच्या लढाईत नवा आत्मविश्वास आणि उत्साह दिला आहे. ऑपरेशन सिंदूर ही केवळ एक लष्करी मोहीम नव्हती, तर आपल्या दृढनिश्चयाचं, धैर्याचं आणि बदलत्या भारताचं चित्र आहे. या चित्राने संपूर्ण देशाला देशभक्तीच्या भावनांनी भरलंय आणि तो तिरंग्यातही रंगवला गेलाय. भारताने बनवलेल्या शस्त्रास्त्रांचं, उपकरणांचं आणि तंत्रज्ञानाचं बळ या ऑपरेशन सिंदूरदरम्यान पहायला मिळालं. या विजयात आपल्या अभियंत्यांच्या, आपल्या तंत्रज्ञांच्या घामाचा सहभाग आहे.""मन की बात'मध्ये त्यांनी गुजरातच्या गीरमध्ये वाढलेल्या सिंहांच्या संख्येचाही उल्लेख केला. "गेल्या पाच वर्षांत**

## अग्रलेख

# - कौतुक -

कौतुक करणे म्हणजे स्वतःची स्तुती कोणीतरी केलेली ऐकून घेणे. अन्य कुणीतरी आपल्याला चांगलं म्हणणं ज्याने आपल्याला बरं वाटतं.कौतुक होण ही माणसाची अत्यावश्यक अशी बेसिक गरज आहे. लहान बालकाला देखील तो चालताना दोन पावलं चालला, की दुगु डुगु लाला म्हटलं किंवा वा वा वा केला की तो पुढे पळायला लागला असता. बालपणापासून या कौतुकाने या पॅम्पपरिंग ने माणसाची प्रगती होत असते. पुढे जायला बक्षीस स्तुती कौतुक आणि पेंपरिन मदत करतं.वःवा मस्तच! छान दिसतेस छान बोलतेस असं कोणी म्हटलं की बरं वाटतं व्यापक विषयाला सर्वतोपरी सामावून घेणारा दीर्घ असा लेख लिहिला असूनही तो उत्कंठावर्धक आणि रंजक ही झाला आहे. लेखकाला सुखावते करमणुकीच्या क्षेत्रातील उत्तुंग अशा सन्माननीय व्यक्तिमत्त्वाचे आणि त्यांनी सादर केलेल्या करमणूक प्रधान कार्यक्रमाचे बहारदार वर्णन करणाऱ्या लेखनाचे वाङ्ग्यीन मूल्य उच्चच आहे. यात नवल ते काय!कारण हा लेख वर्षानुवर्षे साहित्याची अविरत सेवा करणाऱ्या शुभांगी पासेबंद नावाच्या प्रथितयश लेखिकेने लिहिलेला आहे, असं कौतुक कारण मिळाल्यावर काही काळ मूड ठीक होता. परत विघडला हे मूड चे तंत्र जपायचं कसं? भूतकाळात रमण योग्य नव्हे.एक वय झालं की आपण केलेल्या चुका आठवतात. किंवा काही भ्रम आठवतात.' तेरे दर को मानके मंदिर, झुकते रहे हम जितना, कौन झुकेगा उतना?' असं पण वाटतं. तर आपण अधिक तडजोड केली असं वाटतं. तर कधी एखाद्या प्रसंगी चुकून आपण अहंकार दाखवला, याचे दुःख होतं. 'नदी लंघुन जे गेले, तयाची हाक ये कानी' असं सुद्धा वाटतं. मांजर दादा वर्तमान पत्रात जे श्रद्धांजली अथवा बारावा तेरावा मृत्यूच्या बातम्या येत त्या वाचत.मृत्यू ची भीती तर सगळ्यांनाच वाटत असते. पण मृत्यूच्या क्षणापर्यंत कौतुक व्हाव असं माणसाला वाटतं.विचार हे ज्याचं शस्त्र आहे,तो मेंदूवर काम करत राहतो.त्याचे लेखणी शस्त्र आहे,तो लेखणीवर काम करतो.रूप गुण रंग हे ज्याच शस्त्र आहे तो त्या मेकप,त्वचा केस संभाळणे यावर काम करतो. आरोग्य हे ज्याचं शस्त्र वाटत असतं, तो त्या फिटनेस आरोग्यावर काम करतो.जो तो आपापल्या परीने आपलं जे कौतुकाचे स्थान आहे,ते जप्त अबाधित ठेवायचा प्रयत्न करतो. जगात दुःख भरपूर असतात जास्ती हळवा राहून चालत नाही विश्वाचे अर्थ माझे मनी प्रकाशले. असा विचार केला तर त्या वाईट गोष्टी मनात झिरपून आपल्याला नैराशी येतो विश्व तसंच राहील नवीन प्रश्न आणि नवीन अर्थ येत जात राहते. पण तुझ्या कुटुंबासाठी तू नाही राहशील तर तुझ्या हळवेपणाचा काय उपयोग? कुणाची तरी मदत घेण्यात अजिबात चूक नाही तो नोकर घरात येत राहतो एका माणसाशी तुमचा संवाद विसंवाद जे काय व्हायचं ते होत राहतं. स्वतःवर प्रेम करा असं सगळेजण सांगतात पण स्वतःच कौतुक करा असं फार थोडे जण सांगतात अर्थात बऱ्याच जणांना ते सांगायची गरज नसते ते स्वतःचच कौतुक करत असतात. आपल्याला मदत करायला यायला किंवा आपलं कौतुक करण्यासाठी आपल्या जवळ जमायला आपल्याकडे काही शीत असायला लागतात. शीत असतील तरच बुद्ध जमतात त्यासाठी मोठं घर निसर्गरम्य बाग आपण देणारे नोकर ठेवलेली माया बर्फ ठेवून शांतपणे ऐकून घेणे या गोष्टी कराव्या लागतात ज्या अवघड असतात. आपल्याला इथलं नक्की काय जमत नाही हे सुद्धा कधी कधी कळत नाही शेवटी ते विधीनिकेत म्हणून माणसं जमतात किंवा दूर जातात. शिवाय आपल्या मूड प्रमाणे किंवा आपल्या सोयीप्रमाणे ही माणशी जर येतीलच असं नाही कधी आपल्याला अगदी नकोच असतानाही लोकं येतात तर कधी कधी मी यावसं वाटत असतानाही माणसं येत नाहीत. एखादी व्यक्ती आयुष्यात मग काही काळ तरी तिचा सल्ला आपल्याला अपील होतं.आपत्तीच्या सल्ल्याने वागतो कधी तर वाहून पण जातो तो सल्ला चुकीचा असेल बरोबर असेल आपल्याला निरक्षर विवेक सुद्धा जाणवत नाही आणि आपण त्यावर अवलंबून राहू लागतो. तर मित्र-मैत्रिणींनो इतरांचे कौतुक करा स्वतःचे कौतुक करा.



कॅमेरा फोकस,

वर्ग 10 वित 92% गुणांनी उत्तीर्ण झाल्याबद्दल कु. तरल कृष्णा हावरे चा सत्कार करतांना जानेफळ डॉ.असो. अध्यक्ष डॉ. प्रवीण देशमूख साहेब

# - "नारीशक्ती तू असे काय कर्तृत्व केले आहे? -




मानवी जीवनाचा संतुलन सकारात्मक ठेवण्यासाठी परमात्माने स्त्री -पुरुष नावाची संसाराची गाडी शक्ती आणि शिवतत्वाच्या अनुसंगाने बनविली आहे.पुरुष म्हणजे शिवतत्व आणि स्त्री म्हणजे शक्ती तत्व.म्हणून भूतकाळापासून ते वर्तमान काळात मानवाच्या उद्धारा पासून ते त्यांचा विनाश करण्यापर्यंत ,प्रगतीपासून ते अधोगती पर्यंत स्त्री शक्तीची अद्वितीय भूमिका चालत आलेली आहे .आपल्या आई -वडिलांची एक आदर्श मुलगी ,घराला स्वर्ग बनवणारी किंवा घराला घरपण देणारी गृहलक्ष्मी ,आपल्या नवऱ्याच्या सुख -दुःखात ढाल बनून पति परमेश्वर या भावनेने अथांग प्रेम करणारी अर्धांगिनी,आपल्या अपत्यांवर चांगल्या संस्करानी आणि सुसंस्कृतीने सशक्त करणारी मातृ शक्ती,घरामध्ये आध्यात्मिक ज्ञानाचे बीज रुजवून संगीत,नृत्य कला ह्याला प्रतिसाद देऊन घराला देवत्व प्राप्त करून देणारी देवी म्हणजे स्त्री शक्ती.पुराणकाळात अशा अनेक स्त्रीया होत्या ज्या आजही आपल्या सर्वांच्या हृदयात स्त्री शक्ती म्हणून त्यांनी प्रतिमा प्रतिबिंबित केलेली आहे.त्यांना माझा स्व आत्म्याने साष्टांग नमस्कार ...जन्म देणारी माता जर मुलांचा उद्धार करू शकते तर संकटवेळी हातात शस्त्र घेऊन नकारात्मक शक्तीचा संहार करू शकते. म्हणून स्त्री कोमल आहे पण कमजोर नाही.स्त्री ने जर शंका त्याग केली तर ती स्वयं शंकर बनते.मनुष्य धर्माचे पालन करून सृष्टीचे संतुलन सकारात्मक विचारांनी कृतीत आणून परमात्माच्या सान्निध्यात विश्व् निर्मितीचे कल्याण साधने हेच परमात्माचे ध्येय आहे.कुटुंब व्यवस्थापना सुखी -समाधानी होण्याचे अंतर्गत सूत्र संचालन ही स्त्री शक्तीचेच असते.अर्थात पुरुषाचा अहंकार कमी आणि स्त्री ची सहनशीलता जास्त ह्याचे संतुलन गरजेचे आहे.पूर्वीच्या काळात सुख-सोई जास्त नव्हते पण बाल संस्कार ,सुसंस्कृतीचे जतन पारंगत होते.जीवन साधे सरळ मार्गाने सुखी -समाधानी होते .घरातले सात्विक आहारामुळे कुटुंब व्यक्तींचे शरीर सशक्त होते ,आध्यात्मिक ज्ञान ,वडिलधाऱ्यांचे आदर्श ,शिस्तीचे बंधन,आजी-आजोबांचे नातवन्डावर असणारे प्रेमाचे कुंपण,परिस्तिथी प्रगत नसल्यामुळे जशी परिस्थिती असेल तशी राहणीमान होते .त्यामुळे भौतिक गोष्टींचे चोचले नसल्यामुळे आत्मिक दृष्टिकोनावर भर दिला जात असे .त्यामुळे मिळालेल्या गोष्टींची जाणीव लहानांपासून ते वृध्द वयातील लोकांना मनापासून असायची.शारीरिक खेळ ,सात्विक आहार,व्यायाम,लवकर उठणे ,लवकर झोपणे,कुटुंबात आनंदाने राहणे,एकमेकांशी छोट्या -छोट्या गोष्टींचा संवाद करून योग्य ते मार्गदर्शन घेणे,रामायण ,महाभारतातील कथा ऐकून सकारात्मक दृष्टिकोन करणे ,सदभक्ती -सत्कर्माला महत्व देणे ,आपुलकीच्या नात्याने नात्यांमध्ये माणुसकी असणे ह्याला खूपच महत्व होते .जीवन आनंदमय,निरोगी स्वास्थ्य असल्यामुळे ,त्याकाळी माणूस जास्त काळ जगत होता.मात्र या कलियुगात स्त्री-पुरुष समानता या तर्कनिष्ठ पाश्चिमात्य स्वैराचारी वृत्तीने चांगले संस्कार आणि चांगली संस्कृती संपुष्टात आलेली दिसून येत आहे.पाश्चिमात्य संस्कृतीमुळे घरातल्या सर्व सदस्यांना हवे ते स्वातंत्र्य मिळाल्यामुळे कोणत्याही गोष्टीचे पवित्र बंधन राहिले नाही आहे .म्हणून हे आताची नारीशक्ती तू असे काय कर्तृत्व केले आहेस? ह्याचा अंतर्मनाने विचार करून बघ.आताच्या मुली विवाहानंतर जुन्या संस्कृतीचे अलंकार शरीरावर घालत नसल्यामुळे सकारात्मक बंधनाला नकारात्मक शक्तीची सावट बसली आहे .सध्याचा काळ आधुनिक प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत असताना कुटुंब व्यवस्थापना चांगल्या संस्कार आणि संस्कृतीने घडत नसल्यामुळे मुलगा -मुलगी,आई -वडील ह्यांचे मन अस्थिर झाले आहे.आमचा हक्क,आमचे अधिकार ,स्त्री शक्ती सन्मान या सर्व कारणांमुळे काही स्त्रियांचे आध्यात्मिक दूरदृष्टी ,सकारात्मक ज्ञान आणि समज यात भर कमी पडत चालला आहे .त्यामुळे बरीच घरं स्वर्ग बनण्याआधी नरकमय झाले आहेत .करिअर करण्याच्या नादात पती -पत्नींमध्ये संवेदना राहिले नाही आहेत.स्त्रीची आत्मसमर्पणाची भावना संपत चालली आहे.घराला घरपण राहिले नाही आहेत. करिअर क्षेत्रात नावीन्य करण्याच्या नादात घराला जास्त वेळ देता येत नसल्यामुळे घराला सकारात्मक शिस्तीचे कुंपण राहिले नाही आहे .सात्विक आहार बनवायला वेळ अपुरा पडत असल्यामुळे जंक फूड चे घरोघरी आगमन झाले आहे .त्यामुळे मुलांच्या बुद्धीला गंज चढत चालला आहे .लहान मुलांवर बालसंस्कार होत नसल्यामुळे ते लहान वयात नैराश्याला बळी पडत चालले आहे,त्यांचे स्वास्थ्य अस्वस्थ होत चालले आहे ,मन सकारात्मक संतुलन नसल्यामुळे मुलं लहान वयात मनोरुग्ण होत चालले आहे .नाना तऱ्हेचे आजार जळू सारखे शरीराला चिकटले आहेत.आज सुख -सोई भरपूर आहेत .मात्र सकारात्मक विचारांची कृती नसल्यामुळे लहानांपासून ते तरुण पिढी इंटरनेटच्या माध्यमाने संभोग चित्रीकरण बघून संभोगाचे शिकारी बनत चालले आहेत. त्यामुळे घाणेरड्या कामवासनेला भरारी आली आहे,बुद्धी नकारात्मक विचारांनी विपरीत होत चालल्यामुळे कमी वयाच्या मुलांपासून ते तरुण पिढी सिगारेट ,दारू ,ड्रग्स आणि सेक्स ह्याच्या आहारी गेले आहेत. मुलींवर,अपत्यांवर विश्वास टाकून स्पर्धात्मक युगात त्यांना कॉन्फिडन्ट बनवण्याच्या नादात आपलं मुल ओव्हर कॉन्फिडन्ट बनून काहीही करू लागले ह्याचं भान काही पालकांना राहिले नाही आहे ,याला जबाबदार कोण ?तर उत्तर आहे दोष फक्त आणि फक्त अवेळी दिलेल्या स्वातंत्र्याचा आहे.मग मला सांगा,*कोणत्या उद्देशाने स्त्री शक्तीने कशा प्रकारे,कोणत्या प्रकारे आणि मुळात का जागतिक महिला दिन साजरा करायचा ते सांगा ?* तुम्ही असे काय कर्तृत्व केले आहे ज्याने चांगले संस्कार आणि चांगल्या संस्कृतीचे वृक्षारोपण झालेले दिसत आहे .फक्त आधुनिक क्षेत्रात उत्तम शिक्षण ,उत्तम करिअर ,उत्तम पद ,प्रतिष्ठा स्थापन केले म्हणून स्त्री सशक्तीकरण होत नाही .तर झाकली मूठ सव्वा लाखाची ह्याचा अर्थ प्रत्येक स्त्री जातीने आपले सौंदर्याचे दर्पण केवळ सुंदर रूप ,सुंदर शरीर ठेवणे नसून सुंदर चारित्र्याचे दर्पण आत्मिक दृष्ट्या राहिले पाहिजे आणि सुंदर चारित्र्य येण्यासाठी आधुनिक बुद्धीची ,अहं पणाची भावना नव्हे तर आत्मसमर्पणाची गरज आहे.माझ्या मते जूने शास्त्र ,जूने संस्कार-संस्कृती कधीच चुकीचे नव्हते आणि यापुढेही नसणार आहे.मुलींना,स्त्रियांना फ्रीडम नक्कीचं द्या ,पण त्याचा स्वैराचार नको.आपल्या अपत्यांना बाहेर शिकायला नक्की पाठवा ,पण स्त्रियांनी चांगल्या संस्काराची शिदोरी त्यांच्या सोबत द्यायला विसरू नये ,मर्यादेची बाळगुटी लहानपणा पासूनच आठवणीने द्यायला विसरू नये.बालसंस्कार घडण्यासाठी लहान मुलांना त्यांच्या आईने जास्तीत जास्त वेळ देणे काळाची गरज आहे.स्वतःला आणि मुलांना कपडे असे घालायला द्या की स्वतःला आणि समाजाला तुमच्याकडे बघताना लाज नाही वाटली पाहिजे.म्हणजे त्याने कामवासनेला नियंत्रण राहील.मुलींना ,स्त्रियांना आधुनिक काळात,तंत्रज्ञानात नक्कीचं सक्षम बनवा,पण स्त्री तत्वावर तडा पडू देऊ नका.देशाला खरं तर डिजिटल विकासाची गरज नाही आहे.तर आपल्या भारत देशाला आध्यात्मिक ज्ञानाची ,चांगले संस्कार -संस्कृतीची गरज आहे .तरंच आपला देश वाईट नकारात्मक वासनेला बळी पडणार नाही.बलात्कार ,हिंसाचार ,भ्रष्टाचार घडणार नाही .भले एक वेळ भौतिक गोष्टींची मोह माया नसली तरी चालेल पण कुटुंब,घर,समाज,विश्वाला पावित्र्यता देण्यासाठी स्त्री शक्तीने आत्मसमर्पणाने स्वयं परिवर्तन घडविणे काळाची गरज आहे .आपल्या कुटुंबाचे ,समाजाचे ,विश्वाचे कल्याण करून सृष्टी मध्ये सदभक्ती आणि सत्कर्माचा सुगंध पसरायला कारणीभूत ठरा.यात फक्त स्त्रीनेच सगळ्यांना समजून घ्यायची गरज नाही आहे ,तर आपलं कुटुंब ,नातेवाईक ,मित्रपरिवार ,समाज या सगळ्यांची तितकीच जबाबदारी आहे .कारण एकटी स्त्री ही उपभोगाची वस्तू नसून तिच्यामागे जर पुरुष सकारात्मक कृतीने ठामपणे उभा राहिला ,तर समाजात नक्कीचं चांगले परिवर्तन घडायला वेळ लागणार नाही.मग बघा विपरीत बुद्धीचा कहर कसा सदविवेक बुद्धीमध्ये परिवर्तन होतो ,हे सर्वांना अनुभवायला मिळेल.










दैनिक सेवाशक्ती टाईम्स, यह समाचार पत्र के मुद्रक राम प्रिंटिंग प्रेस तहसील चौक मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा प्रिंट करके प्रकाशक मालक अंकोश जानु राठोड द्वारा दैनिक सेवाशक्ती टाईम्स कार्यालय राजीव गांधी कॉम्प्लेक्स मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा, प्रकाशित किया दैनिक सेवाशक्ती टाईम्स प्रकाशक मालक संपादक अंकोश जानु राठोड यह पीआरबी अक्ट के तहत समाचार चयन के लिये संपादक सहमत है ऐसा नही, सभी विवाद मेहकर न्यायालय अंतर्गत संपादक अंकोश जानु राठोड मो, 9011509831 Title code :- MAHMAR52107 Dainik Sevashakti Times, Printer of this Newspaper Ram Printing Press Tehsil Chowk Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha, Printed and Published by Publisher Proprietor Ankosh Janu Rathod Dainik Sevashakti Times Office Rajiv Gandhi Complex Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha Dainik Sevashakti Times Publisher Proprietor Editor Ankosh Janu Rathod This editor agrees for selection of news under PRB Act No, all disputes under Mehkar Court Editor Ankosh Janu Rathod Mo, 9011509831

Title code :- MAHMAR52107

# गृहविभागच्या घडामोडी एसपी पानसरे यांच्या बदलीला 'कॅट'कडून तूर्तास स्थगिती

**सेवाशक्ती टाईम्स.**
**शेख कदीर भाई.**

बुलढाणा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अख्त्या रीतील गृह विभागात गेल्या काही दिवसांत नाट्यमय घडामोडी घडल्या असून, त्याचा केंद्रबिंदू ठरला आहे बुलढाणा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक विश्व पानसरे यांची अमरावती येथील SRPF गट क्रमांक ९ मध्ये बदली करण्यात आली होती. मात्र, या बदलीच्या आदेशावर केंद्रीय प्रशासकीय न्याया धिकरणाने (C A T) स्थगिती दिली आहे.राज्यात २२ मे २०२५ रोजी पोलीस अधीक्षक दर्जाच्या अधि काऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जाहीर करण्यात आले. या आदेशानुसार पानसरे यांची बदली अमरावतीला करण्यात आली, तर नागपूर सीआ यडीचे पोलीस अधीक्षक नीलेश तांबे यांची बुल ढाण्याच्या पोलीस अधीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली. विशेष बाब म्हणजे, आदेश जारी झाल्याच दिवशी




म्हणजे २२ मे रोजी रात्री ११ वाजता तांबे यांनी अनेक तासांचा प्रवास करून बुलढाण्यात दाखल होत पदभार स्वीकारला. दरम्यान, पानसरे यांनी थेट CATमध्ये धाव घेत बदलीच्या आदेशाला आव्हान दिले. न्या. रंजित मोरे यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने या याचिकेवर सुनावणी घेतली आणि पानसरे यांच्या बदली आदेशावर तूर्तास स्थगिती दिली. प्रकरणातील चार प्रतिवादींनाही नोटीस बजावण्यात आली आहे. विशेष म्हणजे, पानसरे यांनी ३१ ऑगस्ट २०२४ रोजी बुल ढाण्याचे पोलीस अधी क्षक म्हणून पदभार स्वीकारला होता. त्यांनी फक्त नऊ महिन्यांचा कार्यकाळ पूर्ण केला आहे. महाराष्ट्र पोलीस अधिनिय मानुसार, पोलीस अधीक्षक पदावर किमान दोन वर्षांचा कार्यकाळ अपेक्षित असतो. या पार्श्वभूमीवर, कार्य काळ पूर्ण होण्याआधीच झालेली ही बदली कायदेशीर नाही, असा युक्तिवाद पानसरे यांच्या वकिलांनी केला. शिवाय, बदली आदेशात कोणतेही स्पष्ट किंवा सबळ कारण नमूद नसल्यामुळे हा आदेश मनमानी स्वरूपाचा असल्या चेही त्यांनी निदर्शनास आणून दिले. या सर्व घडामोडीं मुळे जिल्ह्यातील नागरिकांमध्ये उत्सुकता वाढली असून, पुढील कायदेशीर प्रक्रिया आणि निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

> **दुसरीकडे, नव्याने पदभार स्वीकारलेले पोलिस अधीक्षक नीलेश तांबे हे २०१८ बॅचचे आयपीएस अधिकारी आहेत. त्यांनी २२ मे रोजी रात्रीच पदभार स्वीकारून कामकाज सुरू केले आहे.**

## SRT बिना नांगरणीची शेती सिनेअभिनेते मकरंद अनासपुरे यांच्या हस्ते डॉ.पोटे यांना कृषी सन्मान शेतकरी पुरस्कार प्रदान

**सेवाशक्ती टाईम्स.**
**दिपक जैस्वाल.**

भोकरदन : भोकरदन तालुक्यातील श्री क्षेत्र वालसा (वडाळा) येथील प्रगतशील शेतकरी डॉ. गणेश पाटील पोटे हे गेल्या तीन वर्षापासून बिना नांगरणीची शेती करुन इतर शेकडो शेतकऱ्यांना S R T (शुन्य मशागत पध्दतीने ने शेती करण्यास परावृत्त करतात. या कार्याची दखल घेवून सगुणा रुलर फाउंडेशन तर्फे डॉ गणेश पाटील पोटे यांना कृर्षी शेतकरी सन्मान पुरस्कार जाहिर करण्यात आला. हा पुरस्कार नुकताच दि.22/5/2025 रोजी सगुणा बाग नेरळ रायगड येथे सुप्रसिध्द सिनेअभिनेते- तथा




शेतकरी मित्र मकरंद अनासपुरे यांच्या हस्ते रोख पांच हजार रुपये व प्रशिस्त पथ देवून डॉ.गणेश पोटे यांच्या सह पत्नि सौ ताराबाई गणेश पोटे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. स्वातंत्र्य सैनिक हरिकाका भडसावळे यांच्या जयंती दिनानिमित्त दरवर्षी २२ मे रोजी S R T शेतकरी सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. SRT (शून्य मशागत) तंत्राचे जनक तथा कृषी रत्न कृर्णभूषन चंद्रशेखर भडसावळे दादा, प्रतापदादा चिपळूणकर , SRT- चे स्टार प्रचारक विठ्ठरावजी वैद्य, रावसाहेब पाटील मोरे, यांच्या मार्गदर्शना खाली डॉ.गणेशपाटील पोटेहे गेल्या ३ वर्षापासून S R T पद्धतीने शेती करीत असून कमी खर्चामध्ये भरघोष उत्पादन घेत आहे व शेकडो शेतकयांना सुन्य मशागत ) पद्धतीने शेती करण्यासाठी मार्गदर्शन करीत आहे.सदर सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्राचे प्रसिद्ध सिने अभिनेते ती मकरंदजी अनसपुरे व न्यूज 18 लोक मतचे संपादक श्री मंदारजी फणसे हे होते कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सौ. दिपालीताई केळकर, यांनी केले. या कार्यक्रमान्चे विशेष आकर्षण म्हणजे ABP माझा न्यूजचे वे श्री संदिप रामदासी यांनी 9 SRT चे खंदे व जाणकार शेतकऱ्यांशी हितगुज केली. या कार्य क्रमाला महा राष्ट्रा तील ३0 जिल्हयांतून अंदाजे पाचशे शेतकरी उपस्थित होते.

## खेर्डा बु॥ या चौफुली स्टॅन्डला जलद अतिजलद एसटीचा थांबा द्यावा - प्रवाशी वर्गाची मागणी

**सेवाशक्ती टाईम्स.**
**योगेश उपाध्ये.**

कारंजा लाड : कारंजा तालुक्यातील कारंजा - मुर्तीजापूर व अमरावती पिंजर रोडची चौफुली असलेल्या खेर्डा बु॥ स्टॅन्ड वर जलद अतिजलद एस टी बसेसला थांबा नसल्याने प्रवाशी वर्गाची मोठी गैरसोय होत आहे . कामरगांव प्रमाणे खेर्डा बु॥ येथे जलद अती जलद एसटी बसेसला थांबा देऊन सर्वसामान्य प्रवाशी वर्गाची मागणी जोर धरत असल्याने या प्रकरणी आमदार सईताई डहाके यांनी लक्ष घालावे अशी विनंती सरपंच संघटणेचे




कारंजा तालुका अध्यक्ष नितीन पाटील उपाध्ये यांनी कारंजा मानोरा मतदार संघाचे आमदारांकडे केली आहे . वृत्त असे की कारंजा ते मुर्तीजापर व अमरावती ते पींजर या रोडची चौफुली खेर्डा बु॥ एसटी स्टन्ड आहे येथे पंचक्रोशीतील सर्वसामान्य प्रवाशी नेहमीच एसटी ची तासनतास प्रतीक्षा करतात . जलद अतिजलद एसटी बसेस या थांब्यावर थांबत नसल्याने नाईलाजाने त्यांना जीव धोक्यात घालून प्रवाशी ऍटो कीवा अवैद्य खाजगी वाहनाने प्रवास करावा लागतो . कारंजा आगराची एसटी बस सोडली तर अमरावती वाशिमकडे जाण्यासाठी इतर आगराच्या एसटी बसेस या थांब्यावर थांबत नाही . कामरगांव प्रमाणे कोणत्याही आगराची जलद अतिजलद बस खेर्डा बु॥ या चौफुली स्टॅन्डवर थांबावी व पंचक्रोशीतील सर्वसामान्य प्रवाशी वर्गाला दिलासा द्यावा अशी विनंती आमदार कारंजा मानोरा मतदार संघ यांचेकडे प्रवाशी जनतेची असल्याचे खेर्डा येथील ओमप्रकाश जैस्वाल यांनी केली आहे .

## वाशिम स्थानिक गुन्हे शाखेची ऊत्कृष्ट कामगीरी दिवसा घरफोडीचे 07 गुन्हे उघड; दोन आरोपीच्या आवळल्या मुसक्या

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**

वाशिम : वाशिम पोलीस घटकामध्ये जिल्हा पोलीस अधिक्षक अनुज तारे यांनी पदभार स्विकारल्यापासुन त्यांनी संपत्ती विषयक तसेच इतरही गुन्हे घडणार नाहीत, त्याला प्रतिबंध होईल याकरीता विशेष प्रतिबंधक उपाययोजना राबविल्या. त्याकरीता सतत पेट्रोलींग, वेळोवेळी ऑपरेशन ऑल आउट, कोंबीग ऑपरेशन व नाकाबंदी सारख्या विशेष माहिमा राबवुन रेकॉर्डवरील व माहितगार गुन्हेगारांवर सतत पाळत ठेवुन आरोपीतांविरुध्द प्रभावी प्रतिबंधक कार्यवाहया करण्यात आल्या. परीणामी मागील काही वर्षाचे तुलनेत गुन्हयांमध्ये घट आली आहे.

मालमत्तेचे गुन्हे घडलेच तर घडलेल्या गुन्हयांना उघडकीस आणण्यावर भर दिला. त्याकरीता योजना आखल्या विशेष प्रयत्न केले, केलेले सर्व प्रयत्नांचा अहवाल मागवुन सतत आढावा घेतला. संपत्तीविषयक गुन्हे उघडकीस आणण्याकरीता स्थानिक गुन्हे शाखेला सुचना व आदेश दिले. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेने घडलेल्या गुन्हयांच्या तांत्रीक बाबी तपासुन




विश्लेषनात्मक अभ्यास केला. गुन्हेगारांचे रेकॉर्ड, सिसिटीव्ही फुटेज बघुन आरोपींनी घरफोडी करीता वापरलेल्या पध्दतींचा अभ्यास केल्याने त्यावरुन असे लक्षात आले की, बुलढाणा जिल्हयातील विशीष्ट भागातील घरफोडीचे गुन्हे करणारे गुन्हेगारांच्या टोळया वाशिम, अकोला, अम रावती, बुलढाणा, परभणी, बिड, नाशिक, जळगाव, चाळी सगाव असे महाराष्ट्रातील व मध्यप्रदेश येथील काही जिल्हयांमध्ये सक्रीय आहे. त्यावरुन मागील दोन महिण्यापासुन घरफोडीचे गुन्हेगारांवर सतत पाळत ठेवुन त्यांच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवल्या जात होते. आरोपींना पकडण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे सतत प्रयत्न चालुच होते. दि. २४. ०५. २०२५ रोजी घर फोडीचे गुन्हे करणारे आंतरराज्य टोळीतील गुन्हेगार मालेगाव येथे येत असल्याच्या मिळालेल्या गोपणीय बातमी प्रमाणे अकोला नाका, मालेगाव येथे सापळा रचुन संशयीत इसम १) आकाश प्रकाश पवार वय ३५ वर्ष २) उमेश गटरंग पवार वय २८ वर्ष दोन्ही रा. फत्तेपुर, ता. खामगाव, जि. बुलढाणा यांना कमालीचे प्रयत्न करुन ताब्यात घेतले. त्यांना विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी पो.स्टे. वाशिम येथील अप.क्र. ११२ / २५ अप.क्र. २३९ / २५ अप.क्र. ४१७/२५ अप.क्र. ७५३ / २४ पो.स्टे. रिसोड येथील अप.क्र. ५८१/२४ अप.क्र.१८५ / २४ अप.क्र. ७६ / २४ असे एकुण ०७ गुन्हे त्यांच्या इतर साथीदारासह केल्याची कबुली दिल्याने आरोपीतांकडुन एकुण ५१. २७ ग्रॅम वजनाच्या ०४ सोन्याच्या लगड व १७ तोळे वजनाच्या ०३ चांदीच्या लगड व नगदी १६,००० रुपये असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. घरफोडीचे गुन्हे करणारे आंतरराज्य टोळीतील कुख्यात आरोपी पोलीसांनी पकडुन एकावेळी ०७ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणणे व त्या गुन्हयांमधील चोरीस गेलेली मालमत्ता हस्तगत करणे ही वाशिम जिल्हा पोलीसांकरीता मोठया यशाची व अभिमानाची बाब आहे. सदर कारवाई अनुज तारे, पोलीस अधिक्षक वाशिम, श्रीमती लता फड, अपर पोलीस अधिक्षक, वाशिम, नवदीप अग्रवाल, सहायक पोलीस अधिक्षक यांचे मार्ग दर्शनात पोनि स्थागुशा राम कृष्ण महल्ले, सपोनि योगेश धोत्रे, व अंमलदार विनोद सुर्वे, ज्ञान देव म्हात्रे, अमोल इरतकर, आषिश बिडवे, अवि नाश वाढे, शुभम चौधरी, दिपक घुगे, संतोष कंकाळ, संतोष वाघ यांनी सतत कार्यरत राहुन अथक परिश्रम घेवुन गोपनिय माहिती मिळवुन केलेल्या तांत्रीक तपासामुळेच गुन्हे उघडकीस आले आहेत, याबाबत वरीष्ठ पातळीवर सुध्दा दखल घेण्यात आली आहे.

## शिवमावळे सामाजिक सेवा संघाच्या वतीने विविध सेवांचे शिबिर आयोजन

**सेवाशक्ती टाईम्स.**
**कांताभाऊ राठोड.**

पुणे : शनिवार दिनांक 17/ 05 /2025 ते रविवार दिनांक 18 /05/ 2025 रोजी शिवमावळे सामाजिक सेवा संघाच्या वतीने संस्थापक / अध्यक्ष मा. दिनेश तात्याबा घोलप सर यांच्या मार्गदर्शनाने तसेच उप अध्यक्ष :- मा. पुरुषोत्तम घाग सरांच्या सुचनेने, कुर्ला तालुका अध्यक्ष मा. हर्षल प्रकाश जाधव यांच्या उपस्तिथीत मतदान कार्ड, जेष्ठ नागरिक कार्ड, ई श्रम कार्ड, पॅन कार्ड ची शिबीर राबविण्यात





आली. या कार्यक्रमास खालील मान्य वरांची उपस्तिथी लाभली. मा. ना. श्री. विनोदजी साडविलकर साहेब.रुग्ण मित्र., मा. ना. श्री. किरणजी साळवे साहेब. शौर्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्था (संस्थापक / अध्यक्ष). रुग्ण मित्र. तसेच विशेष सहकार्य : मा. ना. श्री. नागेशजी काटकर साहेब.मा. ना. श्री. राजेशजी भोंडवे साहेब. (विशेष कार्यकारी अधिकारी). जिल्हा : मुंबई, उपनगर.लाभले या भागातील सर्व नागरिक व जेष्ठ मंडळींनी या शिबिराचा भरपूर फायदा घेतला.

## विद्यार्थ्यांना सक्षम करण्यासाठी श्री विद्या आराधना सायन्स अकॅडमी सज्ज

**सेवाशक्ती टाईम्स.**
**मुन्ना ठाकूर.**

देऊळगाव राजा : बालाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या देऊळगाव राजा येथे विद्यार्थांना सक्षम करण्या साठी श्री विद्या आराधना सायन्स अकॅडमी, सातेफळ रोड वर उघडली आहे. सहावी ते दहावी च्या सी बी एस ई, फाउंडेशन, एनईईटी, जे ई ई, एम एच टी - सी ई टी बोर्ड साठी, व्यापक आणि वैय क्तिकृत कोचिंग देते, या उपक्रमाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक कार्यात उत्कृष्ठ कामगिरी करण्यासाठीं आणि त्यांची पूर्ण क्षमता साध्य



करण्या साठीं आवश्यक असलेली संसाधने आणि मार्गदर्शन प्रदान करणे आहे अशी माहिती व्यवस्थापकीय संचालक प्रा आर जी मगर यांनी पत्रकार परिषदेत दिली. संस्थापक अध्यक्ष श्रीमती अनुराधा शिंदे यांनी सांगितले की आमच्या अकॅडमी साठी प्रत्येक विद्यार्थी हा अद्वितीय आहे, आणि म्हणूनच यांना विविध प्रकारचे शिक्षण पर्याय देते, या केंद्रात अनुभवी आणि समर्पित प्राध्यापक आहेत, जे अध्यापनाची आवड असलेले आणि विद्यार्थ्यांना यशस्वी होण्यास मदत करण्यासाठी वचनबद्ध असल्याचे सांगितले, विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण देणे, त्यांच्या शैक्षणिक प्रवासात उत्कृष्ठ कामगिरी करण्या साठीं आवश्यक असलेले ज्ञान, कौशल्ये आणि आत्म विश्वास देऊन सक्षम करणे हे अकॅडमी चे ध्येय आहे असे सांगितले.या अकॅडमी मध्ये शेतकरी,पत्रकार, माजी सैनिक, च्या पाल्यांना तसेच मुलींना फी मध्ये सवलत दिली जाईल अशी माहिती देण्यात आली. पत्रकार परिषदेत प्रा पी टी मोहिते, प्रा चतुरसिंग अरोरा,प्रा भरत कुमार, रमेश साळवे उपस्थित होते.

# सरपंचपती अनंत उर्फ गोपाल चांदणे व त्यांचे सहकारी यांचे स्मशानभूमी साठी आमरण उपोषण सुरु

## मुंदेफळवासीयांना मरणानंतर भोगाव्या लागतात मरण यातना

**सेवाशक्ती टाईम्स.**
**कृष्णा हावरे.**

**बुलढाणा :** मेहकर तालुक्यातील मुंदेफळ येथे सरपंचपती अनंत उर्फ गोपाल चांदणे आणि त्यांचे सहकारी यांनी स्मशानभूमीवरील अतिक्रमण हटविण्यासाठी दि. 24 /05 / 2025 वार... शनि वारला बेमुदत आमरण उपोषणास सुरुवात केली असून, याअगोदर त्यांनी मुंदेफळ येथील स्मशान भूमीसाठी जागा उपल असून सुद्धा सदर जागेवरील अतिक्रमण काढून स्मशानभूमी साठी खुली करून देणे बाबत ग्राम पंचायत प्रशासन, जिल्हा घिकारी यांना विविध निवेदन दिलेले आहेत.वरील उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने अनेक वेळा प्रशासनाला व शासनाला पाठपुरावा करून सुद्धा मुंदेफळ येथील स्मशानभूमीचा प्रश्न प्रलंबित असून मुंदेफळ शिवार गट नंबर 20 मधील 0.40 आर जमीन ही मशीन भूमीसाठी आरक्षित असून तसे 7 / 12 व 8अ च्या तसेच इतर महसूल कागद पत्रावर नमूद आहे तरी स्मशानभूमीसाठी कायदेशीर जागा उपल असून सुद्धा गावातील व्यक्ति मयत झाल्यानंतर त्या प्रेताची अवहेलना होते, मरणानंतर मरण यातना सोसायला लागतात व सदर प्रेताचा अंत्य विधी व रक्षा विसर्जन कोठे करायचा हा मोठा प्रश्न गावकऱ्यांसमोर पडतो. त्यावेळी मृत व्यक्तीचे नातेवाईक व गावकरी स्वातंत्र्योत्तर काळा पासून वरील विषयास अनेक अडचणीचा सामना करून त्रस्त होत झालेले आहेत. तसेच या अगोदर सुद्धा गावकरी व ग्रामपंचायत कार्यालय मार्फत पाठपुरवठा केला असता प्रशासनाकडून कोणतीही ठोस पाऊल उचलण्यात आले नाही





तसेच स्मशानभूमी हा गावकऱ्यांचा अत्यंत निकडीचा व जिव्हाळ्याचा प्रश्न असून वरील अधोरेखित संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने सदर विषयाची तीव्रता लक्षात घेऊन स्मशानभूमीच्या प्रश्न तात्काळ मार्गी लावण्यात यावा तसेच भूमि अभिलेख कार्यालयामार्फत शासनाने तातडीने मोजणी करावी आणि अतिक्रमण तात्काळ काढण्यात यावे आणि सदरील जमीन स्मशान भूमीसाठी खुली करण्यात यावी तसेच विद्यमान तहसीलदार व तत्कालीन तहसीलदार यांना वेळोवेळी निवेदन देण्यात देऊन सुद्धा निवेदनाची दखल गांभीर्याने न घेता गावकऱ्यांची दिशाभूल करण्यात आलेली आहे. यामुळे गावकऱ्यांच्या वतीने आंदो लनाचा पवित्रा अनेक वेळा घेण्यात आला होता. तसेच गावकऱ्यांची मागणी ही रास्त असून सदर मागणी मान्य करणे न्याय व जरुरी होते,परंतु प्रशासनाने गावकऱ्यांच्या निवेदनाला काहीच महत्त्व न देता फक्त लेखी स्वरुपांचे दिशाभूल करणारे उत्तरे दिले परंतु कोणतीही कार्यवाही केली नाही.याकरिता त्रस्त गावकरी उपोषणास बसलेअसून यात सरपंच पती अनंत मदन चांदणे, रमेश डीगांबर चांदणे, अमोल रमेश चांदणे, देवानंद नारायण चांदणे, सुनील रामराव चांदणे, सागर समाधान शिंदे व नागरिक यांनी उपोषणाला दि. 24पासून सुरुवात केली आहे. उपोषण कर्त्याच्या जीवित्वास व आरोग्यास प्रशासन जबाबदार राहील तसेच जोपर्यंत स्मशान भूमीची जागा उपल करून देत नाही तोपर्यंत आम्ही उपोषण मागे घेणार नाही असा आक्रमक पवित्रा उपोषणकर्ते घेत असून,करिता वरील सर्व बाबींचा विचार करून तात्काळ कार्यवाही करावी अशी उपोषण कर्त्यांची मागणी आहे. उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी उपोषण कर्त्यांना भेट देण्यासाठी अंबिका अर्बनचे संस्थापक अध्यक्ष मोहन पाटील घोटे, सामाजिक कार्यकर्ते कृष्णा हावरे, मा. सरपंच किशोर गव्हाड, शिवसेना शहर प्रमुख सचिन उर्फ मंटू राजुरकर, गोवर सिंग चव्हाण, युनूसभाई शेख यांनी भेट दिली. तसेच तलाठी सरदार साहेब यांनी भेट देऊन उपोषणकर्त्यांच्या मागण्या समजून घेतल्या.

---

## ड्रग्स तस्करी थांबविण्यासाठी स्थापन केलेल्या "डॉन समितीवर साखरखेर्डा सरपंच सौ.ज्योतीताई जाधव यांची निवड , सिंदखेडराजा तालुक्यातील तीन सरपंचांचा समावेश

**सेवाशक्ती टाईम्स.**
**समाधान सरकटे.**



**साखरखेर्डा :** नशिल्या पदार्थांची विक्री मोठमोठ्या शहरांत व्हायची परंतू या ड्रग्सचे प्रमाण ग्रामीण भागात जास्त पसरले आहे. यावर प्रतिबंध घालण्या साठी शासनाने जिल्हा स्तरीय समिती स्थापन करून त्याचा प्रतिबंधक प्रचार करण्याची जबाबदारी या समितीवर राहणार आहे.सिंदखेडराजा तालुक्यातील साखरखेर्डा, झोटींगा, सोयंदेव येथील सरपंचांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. साखरखेर्डा येथे ताडी, नशिल्या गोळ्या, गांजा यांचे प्रमाण अलिकडच्या काळात मोठ्या प्रमाणात वाढले आहे. या नशिल्या व आरोग्यास हानि कारक असल्यामुळे आठ ते १० विद्यार्थी व युवकांचा नाहक बळी गेला आहे. साखरखेर्डा, दुसर बीड, सिंदखेडराजा या तीन ठिकाणी महाविद्यालय आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थींना या नशिल्या द्रव्याचे श्रवण करण्या साठी काही युवक बाध्य करतात. एकदा का तो युवक नशेच्या आहारी गेला की तो इतरांना सोबती करतो, अशा पद्धतीने एक चैन निर्माण करण्याचे क्षडयंत्र राबविल्या जाते. नंतर हीच टोळी गैरकृत्य करीत वाम मार्गाला लागले . हा सर्व प्रकार थांबविण्या साठी शाळा, कॉलेज तसेच इतर ठिकाणी ड्रग्सची तस्करी व ड्रग्सचे होणारे दुष्परिणाम सामान्य माणसांपर्यंत पोहोचविण्याकरिता ड्रग्स पीडित यांना विधी सेवा पुरविण्याकरिता राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण नवी दिल्ली, यांच्या आदेशान्वये बुलढाणा जिल्ह्यामध्ये जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांनी जिल्हास्तरीय "डॉन समिती" ( ड्रग्स अवरनेस अँड वेलनेस नेवीगेशन) स्थापन करण्यात आली आहे. यामध्ये सिंदखेड राजा तालुक्यातील साखरखेर्डा ग्रामपंचायतच्या सरपंच सौ. ज्योती ताई अमित जाधव, सोयंदेव येथील सरपंच सौ. रुख्मीना ज्ञानराज इलग, झोटींगा येथील सरपंच अशोक वाघ यांचा समितीचे सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे .साखरखेर्डा हे गाव विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षण क्षेत्रात नावाजलेले गाव असून जिल्हा व जिल्ह्याबाहेरील विद्यार्थी येथे शिक्षण घेण्यासाठी येतात. त्यामुळे या ड्रग्स प्रकरणावर पायबंद घालण्या साठी ज्योती अमित जाधव यांना ठोस पावले उचलावी लागतील अशी माफक अपेक्षा नागरिकांची आहे.

---

## दारव्हा येथे तिरंगा पदयात्रेतून देशभक्तीचा झाला जागर

**सेवाशक्ती टाईम्स.**
**श्याम राठोड.**




**दारव्हा :** रॅलीतील भारत मातेच्या फोटोची व तिरंगी फुग्यांची दोन झाक्या झेड्यानी सजावट देशभक्ती गितानी सर्वभारवुन गेलेदारव्यात तिरंगा पदयात्रेतून देशभक्तीचा जागर करण्यात आला,ऑपरेशन सिंदूर'च्या यशा नंतर भारतीय सेनेच्या सन्मानार्थ शुक्रवारी दि.२३ मे रोजी येथील छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम मधुन सर्वपक्षीय भव्य तिरंगा सन्मान पदयात्रेतून देशभक्तीचा जागर केला गेला. तर दोन झेड्यानी सर्वांचेच लक्ष केंद्रित केले. देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या शूर सैनिकांच्या मनोबलात वाढ करण्यासाठी, ऑपरेशन सिंदूर तसेच दहशतवाद विरोधातील भारतीय सैन्याच्या कारवाईला पाठिंबा दर्शविण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या पुढाकारात काढण्यात आलेल्या सर्व पक्षीय तिरंगा रॅलीच्या निमित्ताने भारतीय सेनेच्या पराक्रमाचा गौरव करण्यासाठी सैनिकांना आम्ही तुमच्या सोबत आहोत, अशी हिंमत देत तुमच्यामुळेआम्ही सुखाने झोपू शकतो, सुरक्षित आहो, हा भाव व्यक्त करीत दारव्हेकरानीं तिरंगा झेंडा घेऊन भारत मातेचा जयजयकार केला वंदे मातरम व भारत मातेचा जयघोष करीत पाकिस्तानला इशारा देणाऱ्या घोषणा देण्यात आल्या.यावेळी यात्रेत विषेश उपस्थित असलेले माजी सैनिकाचं शाल श्री फळ देउन सत्कार करण्यात आले भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तिरंगा सन्मान यात्रा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम मधुन पोलीस स्टेशन ,समोरुन मेन लाईन मधुन छत्रपती शिवाजी महाराज चौक , गोळीबार चौक ते एसटी बस स्टॉपजवळ गोळीबार चौकात हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करुन येथील माजी सैनिकांचा सन्मान करुन राष्ट्रगीताने तिरंगा सन्मान यात्रेचा समारोप करण्यात आला. या तिरंगा सन्मान पद यात्रेत भाजपा यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदा घिकारी व नाग रिक मोठ्या संख्येत उपस्थित होते.

---

## खुशी मानधने सीबीएसई पॅटर्न दहावी परीक्षेत परभणी जिल्ह्यात सर्वप्रथम

**सेवाशक्ती टाईम्स.**
**शुध्दोधन खंदारे.**

**मंठा :** मंठा येथील सुप्रसिद्ध डॉ. नितीन मानधने यांची मुलगी कु. खुशी नितीन मानधने हिने सीबीएसई पॅटर्न दहावी परीक्षेत 99% गुण मिळवून परभणी जिल्ह्यामध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. खुशी मानधने ही सेलू येथील श्रीराम प्रति ष्ठानच्या प्रिंस इंग्लिश शाळेमध्ये शिकत होती. तिच्या या यशा बद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय रोडगे यांनी आपल्या संस्थेतील कर्मचाऱ्यासह मंठा येथे घरी येऊन तिचा सत्कार केला. या यशामागे आपल्या शाळेतील शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन व




आई -वडिलांची प्रेरणा असून पुढील शिक्षणासाठी पुणे येथे जाणार असल्याचे कु. खुशीने सांगितले. तिला वैद्यकीय क्षेत्रातच आपले करिअर घडवायचे असल्याचे तिने यावेळी सांगितले. कु. खुशीला मिळालेल्या या यशा बद्दल शहरातील अनेक प्रतिष्ठित व्यापारी व डॉक्टरांनी घरी जाऊन अभिनंदन केले व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

---

## रस्त्या च्या बाजूला उभ्या असलेल्या इसमास दुचाकीची धडक

**सेवाशक्ती टाईम्स.**
**कार्यालय प्रतिनिधी**

**मेहकर :** भरधाव जाणाऱ्या दुचाकीने रस्त्याच्या बाजूला उभ्या असलेल्या एका इसमास धडक दिली. यात सदर व्यक्तीचा डोळ्यापासून घोट्या पर्यंत पाय फ्रॅक्चर झाला. ही घटना 7 मे रोजी सायंकाळी 7 वाजे दरम्यान लोणार फाटा येथे घडली.यासंदर्भात अशी की की अनिल प्रल्हाद दुतोंडे रा.उसरण ता.मेहकर लोणार फाटा येथे रोडच्या खाली डाव्या साइडला उभे होते. यातील आरोपी युनिकार्न मोसा क्र.MH- 28 - CB - 6062 चा चालक राहुल भिमराव गायकवाड रा.अंजनी ता. लोणार याने त्याचे ताब्यातील दुचाकी भारधाव वेगाने व



निष्काळजीपणाने चालवुन फिर्यादीचे भावास गंभीर जखमी केले. यात त्यांच्या उजव्या पायाला टोंगळया पासुन घोटयापर्यंत फॅक्चर झाले. अशा प्रकारची तोंडी फिर्याद जखमी चा भाऊ गजानन प्रल्हाद दुतोंडे वय 42 वर्ष रा. उसरण ता. मेहकर त्यांनी मेहकर पोलीस स्टेशनला दिली.या वरुन अप नं. 316/2025 कलम 281, 125 (A), 125(B) BNS अन्वये मेहकर पोलीस स्टेशनच्या दप्तरी गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोहेका सदानंद चाफले हे करत आहेत.

---

# विकास कामांसाठी लागणा-या निधींचे प्रस्ताव वेळेत सादर करावेत - राज्यमंत्री माधुरी मिसाळ

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अहेमद अन्सारी.**

**पाथरी :** दि. 25 /05/2025. जिल्ह्यातील विविध विकास कामांसाठी लागणाऱ्या निधींचे प्रस्ताव वेळेत सादर करावे. निधी प्रस्ताव पाठविणे प्रलंबित राहू नये, याची दक्षता सर्व विभागप्रमुखांनी घ्यावी, असे निर्देश नगरविकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्याक विकास व औकाफ राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले. जिल्हा धिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत श्रीमती मिसाळ यांनी आज नगरविकास, अल्प संख्याक, सामाजिक न्याय, परिवहन, वैद्यकीय शिक्षण विभागांच्या विविध योजना व त्यांच्या अंमल बजावणी स्थितीचा सविस्तर आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी सदर निर्देश दिले. बैठकीस अपर जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे, मनपा आयुक्त धैर्यशील जाधव, निवासी उपजिल्हा घिकारी अनुराधा ढालकरी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रश्मी खांडेकर आदींसह संबंधित विभागाचे विभागप्रमुख उपस्थित होते. प्रारंभी संबंधित विभागाच्या विभाग प्रमुखांनी आपल्या विभागाशी संबंधित योजनांच्या सद्यस्थिती बाबत माहितीचे सादरी करण केले. श्रीमती मिसाळ म्हणाल्या की, केंद्र व






राज्य शासनाच्या विविध योजनाच्या विविध योजना आहेत. प्रत्येक विभागाने जिल्ह्याच्या विकासा साठी कोण - कोणत्या योजनेमधून निधी प्राप्त होईल, याबाबत माहिती असली पाहिजे. वेळेत प्रस्ताव पाठ विल्यानंतर संबंधित योजने मधून निधी मंजूर होतो. या निधीचा उपयोग जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी करावा. सुरवातीला परभणी शहर महानगरपालिका अंतर्गत मान्सून पूर्व नालेसफाईची कामाबाबत सद्यस्थिती आणि संसर्गजन्य आजारा बाबत करण्यात आलेल्या उपाय योजना, शहराच्या पिण्याच्या पाणी पुरवठा बाबत माहिती मनपा आयुक्त यांच्याकडून त्यांनी जाणून घेतली. जिल्हा नियोजन कार्यालयाकडून राबविण्यात येणाऱ्या अल्पसंख्याक योजना बाबत अल्पसंख्याक समाजा तील सर्व घटकाला योग्य न्याय देण्याच्या सूचना त्यांनी अल्प संख्याक विभागाला दिल्या. मनपा अल्प संख्याक वसतीगृहात प्रवेशक्षमता वाढविण्यासाठी प्रचार-प्रसिद्धी करण्याच्या सूचनाही यावेळी त्यांनी दिल्या. केंद्र शासनाच्या रस्ता सुरक्षा सप्ताह अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात ट्रेनिंग सेंटर आणि टेस्टींग सेंटरसाठी जागा निश्चिती करुन त्याचा प्रस्ताव शासनाला पाठविण्याचे निर्देश एसटी महा मंडळाला त्यांनी दिले. शासकीय वैद्यकीय महा विद्यालया अंतर्गत वसतीगृह, प्रवेश क्षमता, शासकीय वैद्यकीय महा विद्यालय प्रस्तावित बांधकाम बाबतची माहिती यावेळी वैद्यकीय अधिष्ठाता श्री. भिसे यांनी दिली. उप प्रादेशिक परिवहन कार्यालया अंतर्गत रस्ता सुरक्षा सप्ताह अंतर्गत केलेल्या कार्याचा आढावाही त्यांनी यावेळी घेतला. मुख्यमंत्री 100 दिवसांच्या कार्यक्रमामध्ये सर्व विभागांनी खुप चांगल्या प्रकारे काम केले आहे. येणाऱ्या 150 दिवसांच्या कार्य क्रमध्येही आपण निश्चितच चांगले काम कराल अशा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. जिल्ह्यातील विकास कामांच्या बाबतीत ज्या काही अडचणी असतील त्याबाबत मंत्रालय स्तरावर पाठपुरावा करुन त्या निश्चितपणे सोडविण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.